| | | | |
|---|---|---|---|
| MHBI160001082017 | दाखल दिनांक | : | १२.०१.२०१७ |
| | नोंदणी दिनांक | : | १६.०१.२०१७ |
| | निकाल दिनांक | : | १२.०३.२०२६ |
| | कालावधी | | वर्षे ०९ महिने ०१ दिवस २७ |

**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, शिरुर कासार, जि.बीड यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी : अक्षय सं. जगताप)**
(न्यायनिर्णय : दिनांक १२ मार्च २०२६)

**नि.फौ.खटला क्र.८/२०१७**
**निशाणी क्र.६१/ब.**

प्रथम खबर अहवाल तपशील
गुन्हा नोंद क्र. : १२२/२०१६
पोलीस ठाणे : शिरुर कासार, जि.बीड

| | |
|---|---|
| **फिर्यादी** | **महाराष्ट्र शासन**<br>मार्फत–पोलीस ठाणे शिरुर कासार,<br>ता. शिरुर कासार, जि.बीड. |
| सरकारी अभियोक्ता | श्री. डी. एम. पाटील |
| **आरोपी** | **रामदास लक्ष्मण काळे**<br>वय : ५५ वर्षे,<br>रा. मदमापुरी, ता. शिरुर कासार, जि.बीड |
| आरोपीचे विधीज्ञ | श्री. बी. बी. जायभाये |

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | ०१.०८.२०१६ |
| प्रथम खबर अहवाल | ०५.०८.२०१६ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | १२.०१.२०१७ |
| दोषारोप निश्चीती दिनांक | १६.०९.२०१९ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | १६.०९.२०१९ |
| निकाल राखुन ठेवल्याचा दिनांक | १२.०३.२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | १२.०३.२०२६ |

## आरोपीचा तपशील

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामीनवर मुक्त झाल्याचा दिनांक | दोषारोपाचे कलम | आरोपीस शिक्षा किंवा निर्दोष मुक्त केले. | शिक्षा | **Period of detention undergone during trial.** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **रामदास लक्ष्मण काळे** | -- | २०/०९/२०१६ | भादंवि चे ३२४, ३२३, ५०४, ५०६ अन्वये | दोषारोपातुन मुक्त केले | -- | -- |

## अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार

| अ.सा. | साक्षीदारांची नांवे | निशाणी क्र. | साक्षी प्रकार |
|---|---|---|---|
| १ | मधुकर रामभाऊ कांबळे | २८ | फिर्यादी |
| २ | मधुकर आबासाहेब मुळे | ३७ | घटनास्थळ पंच |
| ३ | बाबु याकुब शेख | ४४ | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |
| ४ | मनिषा मधुकर कांबळे | ४५ | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |
| ५ | डॉ. दत्तात्रय सुर्यभान जवरे | ४९ | वैद्यकीय अधिकारी |
| ६ | अच्युत दासराव विधाते | ५२ | तपासी अंमलदार |

## आरोपी तर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार

| अ.सा. | साक्षीदारांची नांवे | साक्षी प्रकार |
|---|---|---|
| – | – | – |

## न्यायालया मार्फत तपासण्यात आलेले साक्षीदार

| अ.सा. | साक्षीदारांची नांवे | साक्षी प्रकार |
|---|---|---|
| – | – | – |

## अभियोग पक्षातर्फे देण्यात आलेल्या निशाणी

| अ.क्र. | निशाणी क्र. | कागदपत्राचा तपशील |
|---|---|---|
| १. | २९ | फिर्याद |

| | | |
|---|---|---|
| २. | ५० | वैद्यकीय प्रमाणपत्र |
| ३. | ५३ | घटनास्थळ पंचनामा |

**मान्य केलेली कागदपत्र**

| अ.क्र. | निशाणी क्र. | कागदपत्राचा तपशील |
|---|---|---|
| – | – | – |

**आरोपी तर्फे देण्यात आलेल्या निशाणी**

| अ.क्र. | निशाणी क्र. | कागदपत्राचा तपशील |
|---|---|---|
| – | – | – |

**न्यायालया तर्फे देण्यात आलेले निशाणी**

| अ.क्र. | निशाणी क्र. | कागदपत्राचा तपशील |
|---|---|---|
| – | – | – |

**मुद्देमालचा तपशील**

| अ.क्र. | मुद्देमाल क्रमांक | मुद्देमालाचा प्रकार |
|---|---|---|
| – | – | – |

:: **न्या य नि र्ण य** ::

(दिनांक १२ मार्च २०२६ रोजी घोषीत)

आरोपी विरुध्द भारतीय दंड संहिता कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ अन्वये खटला चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाचे कथन**

२) दिनांक ०५/०८/२०१६ रोजी फिर्यादी मधुकर रामा कांबळे याने सरकारी दवाखाना, बीड तोंडी जबाब दिला की, दिनांक ०१/०८/२०१६ रोजी सायंकाळी ०४.०० ते ०५.०० वाजण्याच्या सुमारास तो घरी असताना आरोपी

त्याच्याकडे आला व फिर्यादीस 'तु खोपटी येथील लोकांना का साथ देतोस' असे म्हणुन शिवीगाळ केली व चाबकाचे लोखंडी पाईपने फिर्यादीच्या डोक्यात मागील बाजुस मारले. त्यामुळे फिर्यादी खाली पडला. त्यानंतर आरोपीने फिर्यादीच्या छातीवर बसुन फिर्यादीस पुन्हा लोखंडी पाईपने उजव्या हातावर, डाव्या पायाच्या नडगीवर मारले. तसेच फिर्यादीचे कानावर मारले. त्यानंतर आरोपीने फिर्यादीस एक कार्ड दाखवुन 'मला एका वर्षात चार माणसे मारण्याचा परवाना आहे' असे म्हणुन फिर्यादीस जीवे मारण्याची धमकी दिली. सदर घटनेची माहिती फिर्यादीच्या पत्नीस मिळाल्यानंतर ती फिर्यादीकडे आली. त्यानंतर आरोपीने केलेल्या जबर मारहाणीत फिर्यादी बेशुध्द पडला. पुढे फिर्यादी दवाखान्यात उपचारा दरम्यान शुध्दीवर आला.

३) फिर्यादीच्या सदरच्या तोंडी तक्रारीवरुन पोलीस स्टेशन, शिरुर कासार येथे आरोपीचे विरोधात प्रथम खबर अहवाल क्रमांक १२२/२०१६ भारतीय दंड विधानाचे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ अन्वये नोंदविण्यात आला.

४) तपासादरम्यान फिर्यादीचा पुन्हा पुरवणी जबाब नोंदवण्यात आला. पुरवणी जबाबा दरम्यान फिर्यादीने घटना ही त्याच्या घरात घडली नसुन दिनांक ०१/०८/२०१६ रोजी सायंकाळी ०४.०० ते ०५.०० वाजण्याच्या सुमारास मौजे मदमापुरी येथील डोकरीच्या डोंगरावर तो शेळ्या राखत असताना आरोपीने त्यास चाबकाच्या लोखंडी पाईपने मारहाण केल्याचे व सदर घटने वेळी साक्षीदार शेख बाबु शेख याकुब हा प्रत्यक्ष हजर असल्याचे आणि घटनेनंतर त्याची पत्नी घटनास्थळी आल्याचे कथन केले आहे.

५) अपराध क्र. १२२/२०१६ चा तपास ए.एस.आय. ए.डी.विधाते,

ब.नं.२१४९ यांच्याकडे सोपविण्यात आला. तपासादरम्यान तपासी अंमलदाराने घटनास्थळी भेट देवुन दोन पंचासमक्ष घटनास्थळ पंचनामा केला, वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त केले, साक्षीदारांची तपास टिपणे त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविली आणि आरोपीस नोटीस दिली. तपासाअंती तपासी अंमलदाराने आरोपी विरुध्द भारतीय दंड संहिता कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ अन्वये दोषारोपत्र न्यायप्रविष्ठ केले.

## दोषारोप व आरोपीचे म्हणणे

६) दोषारोपपत्र व दस्तऐवजांचे अवलोकन करुन तत्कालीन न्यायिक अधिकारी यांनी निशाणी १४ कडे आरोपी विरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ अन्वयेचा दोषारोप निश्चित केला. आरोपीस दोषारोप त्याच्या भाषेत वाचुन व समजावुन सांगितला. आरोपीने दोषारोप नाकारुन संपरिक्षा करण्याची विनंती केली.

७) अभियोगपक्षाच्या पुराव्याअंती आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वयेचे निवेदन निशाणी ५५ कडे नोंदविण्यात आले आहेत. आरोपीचा बचाव हा संपुर्णतः नकारार्थी स्वरुपाचा आहे.

## मुद्दे व निष्कर्ष

८) सरकारपक्षा तर्फे विद्वान विधिज्ञ डी. एम. पाटील यांचा युक्तीवाद ऐकला. आरोपी तर्फे विद्वान विधिज्ञ बी. बी. जायभाये यांचा युक्तीवाद ऐकला. साक्षीपुरावे व संचीकेचे अवलोकन केले. आरोपी पक्षाचा युक्तीवाद व प्रकरणाचे स्वरुप पाहता खालील मुद्दे विचाराधीन येतात. सदर मुद्द्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालील प्रमाणे नोंदविण्यात आले आहेत.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | दिनांक ०१/०८/२०१६ रोजी दुपारी ०४.०० ते ०४.३० वाजण्याच्या दरम्यान मदमापुरी शिवारातील डोकरी नावाच्या शेतात आरोपीने फिर्यादीस चाबकाचे लोखंडी पाईपने व लाथाने फिर्यादीच्या डोक्यात, हातावर, पायावर, कानावर मारहाण करुन जखमी करुन इच्छापुर्वक दुखापत पोहोचवली ही बाब अभियोगपक्षाने शाबित केली आहे काय ? | नाही. |
| २) | वर नमूद केलेली तारीख, वेळ व ठिकाणावर आरोपीने फिर्यादीस मारहाण करुन इच्छापूर्वक दुखापत पोहोचवली ही बाब अभियोजन पक्षाने शाबित केली आहे काय ? | नाही. |
| ३) | वर नमूद केलेली तारीख, वेळ व ठिकाणावर आरोपीस शिवीगाळ करुन प्रक्षोभीत केले की ज्यामुळे तो शांततेचा भंग करु शकतात अथवा इतर कोणताही गुन्हा करु शकतात याची आरोपीस कल्पना होती ही बाब अभियोजनपक्षाने शाबित केली आहे काय? | नाही. |
| ४) | वर नमूद केलेली तारीख, वेळ व ठिकाणावर आरोपीने फिर्यादीस धमकी देवून त्याच्यावर फौजदारीपात्र धाकदपटशा केल्याची बाब अभियोजन पक्षाने शाबित केली आहे काय ? | नाही. |
| ५) | अंतीम आदेश काय ? | आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

**का र ण मि मां सा**

९) अभियोगपक्षाने आरोपी विरुध्द गुन्हा सिध्द करण्याच्या संबंधाने वर नमुद एकुण ०६ साक्षीदार तपासले आहेत. अभियोगपक्षाला उर्वरीत साक्षीदारांची साक्ष तपासण्याची वारंवार संधी देण्यात आली. परंतु अभियोगपक्ष सदरील साक्षीदारांना

साक्षीकामी हजर ठेवु शकला नाही. त्यामुळे अभियोग पक्षाचा पुरावा निशाणी १ वर आदेश पारित करुन बंद करण्यात आला. उलटपक्षी आरोपी तर्फे त्याचे बचावात कोणताही तोंडी अथवा लेखी पुरावा सादर करण्यात आलेला नाही.

**<u>मुद्दा क्र. १ ते ४ करिता</u>** –

१०) मुद्दा क्र. १ ते ४ हे एकाच घटनेशी निगडीत असल्यामुळे त्यांचे विवेचन एकत्रीत करण्यात येते.

११) अभियोगपक्षाने आरोपी विरुध्द ठेवलेले भारतीय दंड विधान कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ अन्वयेचे दोषारोप शाबीत करण्याकरीता आरोपीने फिर्यादीस चाबकाचे लोखंडी पाईपने मारहाण करुन इच्छापुर्वक दुखापत पोहचवुन शिवीगाळ केली व जीवे मारण्याची धमकी दिल्याचे अभियोग पक्षाने शाबीत करणे गरजेचे आहे. अभियोगपक्षाने आरोपी विरुध्द ठेवलेले दोषारोप शाबीत केले किंवा नाही हे पाहणे करीता अभियोग पक्षातर्फे आलेल्या तोंडी व लेखी पुराव्याचे सुक्ष्मपणे अवलोकन करणे गरजेचे आहे.

१२) अभियोगपक्षा मार्फत तपासण्यात आलेली साक्षीदार क्र.१ मधुकर रामदास कांबळे हा प्रस्तुत प्रकरणातील फिर्यादी साक्षीदार असुन साक्षीदार क्र. ४ मनिषा मधुकर कांबळे ही साक्षीदार क्र. १ ची पत्नी तथा साक्षीदार आहे. तर साक्षीदार क्र.३ बाबु याकुब शेख हा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहे.

१३) फिर्यादी साक्षीदार क्र.१ याचे पुराव्याचा सारांश असा की, आरोपीस तो ओळखतो. दिनांक ०१/०८/२०१६ रोजी दुपारी ०४.०० ते ०४.३० वाजण्याच्या दरम्यान डुकरीच्या शेतामध्ये आरोपीने त्याच्यावर हल्ला केला व लोखंडी पाईपने त्याचे पायावर, डोक्यावर व पाठीत मारहाण केली. त्यावेळी साक्षीदार क्र.३ बाबु हा त्या

ठिकाणी आला व त्याने फिर्यादीच्या घरी फोन केला. त्यानंतर फिर्यादीची पत्नी साक्षीदार क्र.४ मनिषा हिने त्यास बीड येथील सरकारी दवाखान्यात नेले. त्याठिकाणी त्याच्यावर डॉक्टरांनी उपचार केले व तो दुसऱ्या किंवा तिसऱ्या दिवशी शुध्दीवर आला. त्यानंतर १० दिवसांनी त्यास डॉक्टरांनी डिस्चार्ज दिला. फिर्यादीने त्याचे पुराव्यात त्याने आरोपी विरुध्द निशाणी २९ अन्वये फिर्याद दिल्याचे कथन केले आहे.

१४) साक्षीदार क्र. ३ बाबु याकुब शेख हा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहे. साक्षीदार क्र.३ ने त्याचे पुराव्यात असे कथन केले आहे की, आरोपीस तो ओळखत असुन दिनांक ०१/०८/२०१६ रोजी दुपारी ०४.०० ते ०४.३० वाजण्याच्या सुमारास तो डुकऱ्या नावाच्या शेतात शेळ्या सांभाळीत असताना आवाज आल्याने त्याने पाहिले असता आरोपी हा फिर्यादीस लोखंडी पाईपने मारहाण करित होता व फिर्यादी बेशुध्द अवस्थेत खाली पडला होता. त्यावेळी आरोपीने पाईपने फिर्यादीच्या डोक्याला, कानामागे, डाव्या पायाच्या नडगीवर मारहाण केली. त्यानंतर त्याने बाबासाहेब बेदरे व अमोल बेदरे यांना बोलावुन घेतले व फिर्यादीस मदमापुरी येथे घेवुन जाण्यास सांगितले. आरोपी हा फिर्यादीस खोपटी गावाच्या लोकांना साथ का देतास असे म्हणत होता.

१५) साक्षीदार क्र.४ ही फिर्यादीची पत्नी असुन तिने तिचे पुराव्यात असे कथन केले आहे की, दिनांक ०१/०८/२०१६ रोजी ती शेतामध्ये खुरपीत असताना तिला आवाज आल्याने ती तिच्या पतीकडे गेली. त्यावेळी आरोपीने तिच्या पतीस लोखंडी पाईपने डोकरीच्या शेतात डाव्या हाताला व उजव्या कानाच्या बाजुला व मानेला मारले होते. आरोपीने तिचे पतीस कार्ड दाखवुन अजुन चार जणांना मारायचे आहे असे म्हणाल्याचे तिला तिचे पतीने सांगितले. त्यानंतर तिचे पती बेशुध्द झाले. तिचे पतीला उपचाराकरिता बीड येथील सरकारी दवाखान्यात नेण्यात आले.

१६) आरोपी तर्फे फिर्यादी साक्षीदार क्र.१ व त्याची पत्नी साक्षीदार क्र. ४ व साक्षीदार क्र.३ यांचा उलटतपास नोंदविण्यात आला. साक्षीदार क्र.१ ने उलटतपासा दरम्यान घटना त्याचे घरी घडल्याचे त्याचे जबाबात चुकीचे नमुद केले आहे. तसेच त्याने पोलीसांना जबाब देते वेळी साक्षीदार क्र.३ हा घटनास्थळी होता व त्याने त्याचे घरच्यांना फोन करुन बोलावुन घेतले आणि त्यानंतर त्याची पत्नी आली असा मजकुर पोलीसांना सांगितला होता असे कथन केले आहे. परंतु, सदरचा मजकुर त्याचे जबाबात नमुद नसल्याचे मान्य केले आहे. साक्षीदार क्र. १ यांचे उलटतपासणी दरम्यान आरोपींनी असा बचाव घेतला आहे की, साक्षीदार क्र. १ हा मोठ्या दगडावरुन खाली पडुन जखमी झाला आणि त्याचा गैरफायदा घेवुन फिर्यादीने आरोपी विरुध्द दुश्मनी असल्याने पूर्ववैमनस्यातुन खोटी केस केली आहे. परंतु, सदरचा बचाव फिर्यादी साक्षीदार क्र. १ ने नाकारला आहे.

१७) साक्षीदार क्र.३ ने त्याचे उलटतपासादम्यान तो घटनास्थळी गेला त्यावेळी आरोपी घटनास्थळावरुन पळुन गेला होता व त्याने प्रत्यक्ष भांडण सोडवले नसल्याचे कथन केले आहे व इतर प्रश्नांना नकारात्मक उत्तरे दिले आहेत.

१८) साक्षीदार क्र.४ ने तिच्या उलटतपासा दरम्यान असे कथन केले आहे की, भांडणाचा आवाज आल्यानंतर तिला तिच्या पतीकडे जाण्याकरिता अर्धा तास वेळ लागला व तिने कथन केलेली घटना प्रत्यक्ष पाहिलेली नाही.

१९) अभियोगपक्षा मार्फत तपासण्यात आलेले साक्षीदार क्र. ५ डॉ. दत्तात्रय सुर्यभान झवरे हे प्रस्तुत प्रकरणातील वैद्यकिय अधिकारी असुन त्यांनी त्यांच्या साक्षीत असे कथन केले की, दिनांक ०१/०८/२०१६ रोजी ते ग्रामीण रुग्णालय, रायमोहा

येथे वैद्यकिय अधिकारी या पदावर कार्यरत होते. त्या दिवशी मधुकर रामा कांबळे हा रुग्ण ग्रामीण रुग्णालय, रायमोहा येथे आला व त्याने त्यास मारहाण झाल्याचे सांगितले. त्यानंतर त्यांनी जखमीची वैद्यकीय तपासणी केली व तपासणीच्या अनुषंगे निशाणी ५० अन्वये वैद्यकीय प्रमाणत्र दिले होते. साक्षीदार क्र.५ ने त्यांच्या पुराव्यात जखमी साक्षीदार क्र.१ मधुकर यास खालीलप्रमाणे जखमा आढळुन आल्याचे कथन केले आहे.

1) Contusion on right temporal region,
2) Contusion at right arm,
3) Left leg tibia,
4) Abrasion at left ear

२०) साक्षीदार क्र.५ ने वरील जखमा ह्या साधारण स्वरुपाच्या असुन त्या तपासणी पुर्वी २४ तासात घडलेल्या असल्याचे कथन केले आहे. साक्षीदार क्र. ५ ने त्याच्या उलटतपासादरम्यान जखमीस झालेल्या वर नमुद जखमा जर दुचाकीवरून खडबडीत पृष्ठभागावर पडल्यास होवु शकतात असे मान्य केले आहे. तसेच वैद्यकीय तपासणी वेळी जखमी हा शुध्दीत असल्याचे कथन केले आहे.

२१) अभियोगपक्षा मार्फत तपासण्यात आलेले साक्षीदार क्र. ६ अच्युत दासराव विधाते हे प्रस्तुत प्रकरणातील तपासी अंमलदार असुन त्यांनी त्यांच्या साक्षीत असे कथन केले की, प्रस्तुत प्रकरणाच्या तपासादरम्यान त्यांनी मदमापुरी येथे जावुन दोन पंचासमक्ष निशाणी ५३ अन्वये घटनास्थळाचा पंचनामा केला. घटनास्थळ हे मदमापुरी येथील बेद्रे वस्तीजवळील डोंगराच्या पायथ्याशी होते. साक्षीदार क्र.३ याने त्यांना घटनास्थळ दाखविले. त्यानंतर त्यांनी साक्षीदारांचे तपास टिप्पण नोंदविले, जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त केले आणि तपासाअंती आरोपी विरुध्द गुन्हा निष्पन्न झाल्याने दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

२२) साक्षीदार क्र.६ ने त्याचे उलटपासादरम्यान जखमी साक्षीदार क्र.१ ने त्याचा जबाब नोंदविते वेळी घटना जखमीच्या घरासमोर घडल्याचे सांगितले होते असे कथन केले आहे. त्याचप्रमाणे त्याने जखमीच्या घराचा पंचनामा केला नसल्याचे मान्य केले आहे.

२३) अभियोगपक्षा मार्फत तपासण्यात आलेले साक्षीदार क्र. २ मधुकर आबासाहेब मुळे हा प्रस्तुत प्रकरणातील घटनास्थळ पंच आहे. त्याने त्याच्या पुराव्यात अभियोग पक्षास सहायक असे कथन केले नाही. त्यामुळे अभियोग पक्षाने न्यायालयाच्या परवानगीने सदर साक्षीदाराला उत्तरसुचक प्रश्न विचारले. परंतु, अभियोगपक्षास सहायक असे पटलावर काहीही आले नाही. त्याने त्याच्या साक्षीत त्यास पंचनाम्यातील मजकुर माहिती नसल्याचे कथन केले आहे. त्यामुळे साक्षीदार क्र. २ याचे पुराव्या आधारे कोणतेही निष्कर्ष काढता येत नाही.

२४) आरोपी विरुध्द ठेवण्यात आलेले दोषारोपास अनुसरुन अभिलेखावर आलेला तोंडी व लेखी पुरावा पाहिला असता असे दिसुन येते की, प्रस्तुत प्रकरणात अभियोगपक्षाने तपासलेला साक्षीदार क्र. ३ बाबु हा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार व साक्षीदार क्र. ४ मनिषा ही फिर्यादीची पत्नी आहे. साक्षीदार क्र.३ व ४ यांचे पुराव्यावरुन साक्षीदार क्र. ४ ही घटनेस्थळी हजर नव्हती व तिस घटने संदर्भात फिर्यादी साक्षीदार क्र.१ ने सांगितल्याचे दिसुन येते. यावरुन साक्षीदार क्र.४ ही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नसुन तिने तिचे साक्षीत केलेली कथने ही ऐकीव माहिती आधारे कथन केल्याचे दिसुन येते. भारतीय पुरावा कायदा कलम ६० नुसार ऐकीव पुराव्यास फारसे महत्व प्राप्त होत नसल्याने साक्षीदार क्र.४ चे पुराव्या आधारे घटनेसंदर्भात कोणतेही निष्कर्ष काढता येत नाहीत.

२५) प्रस्तुत प्रकरणात जखमी तथा फिर्यादी साक्षीदार क्र.१ व साक्षीदार क्र.३ आणि साक्षीदार क्र.४ यांच्या पुराव्याचे एकत्रात अवलोकन केले असता असे दिसुन येते की, फिर्यादी साक्षीदार क्र.१ ने त्याचे पुराव्यात साक्षीदार क्र.३ बाबु याने घटनेनंतर त्याच्या पत्नीस फोन करुन बोलावुन घेतल्याचे कथन केले आहे. तर साक्षीदार क्र.३ याने त्याचे पुराव्यात कोठेही जमखीची पत्नी म्हणजेच साक्षीदार क्र.४ हिचा उल्लेख केलेला नाही. तसेच साक्षीदार क्र.४ हिस फोन करुन बोलावुन घेतल्याचे देखील कथन केले नाही. त्याचप्रमाणे साक्षीदार क्र.४ ने देखील तिच्या पुराव्यात कोठेही तिला साक्षीदार क्र. ३ ने फोन करुन बोलावुन घेतल्याचे कथन केले नाही. उलटपक्षी, तिने घटने वेळी ती शेतामध्ये खुरपण्याचे काम करित असताना घटनेचा आवाज आल्याने ती तिच्या पतीकडे म्हणजेच जखमी साक्षीदार क्र.१ कडे गेल्याचे कथन केले आहे. परंतु, वर नमुद केल्याप्रमाणे साक्षीदार क्र.१ ने त्याची पत्नी साक्षीदार क्र.४ ही घटने वेळी शेतामध्ये उपस्थित असल्याचे कथन केलेले नाही. साक्षीदार क्र.१, ३ व ४ यांच्या पुराव्यातील वरील सर्व कथनांवरुन त्यांचे पुराव्यात एकसाम्यता नसुन साक्षीदार क्र.४ चे घटनास्थळी उपस्थिती संदर्भात पुर्णत: विरोधाभास दिसुन येतो.

२६) फिर्यादी तथा जखमी साक्षीदार क्र.१ ने त्याचे पुराव्यात घटनास्थळ हे डोकरीच्या शेतामध्ये असल्याचे कथन केले आहे. परंतु, फिर्यादी जबाबात घटना ही त्याचे घरी घडल्याचे कथन केले आहे. त्यासंदर्भात साक्षीदार क्र.१ याने उलटतपासा दरम्यान आरोपी तर्फे प्रश्न विचारले असता त्याचे फिर्यादी जबाबात नमुद घटनास्थळ हे चुकीचे असल्याचे कथन केले आहे. साक्षीदार क्र.१ ने त्याने घटनास्थळ फिर्यादी जबाब देताना चुकीचे का नमुद केले याबद्दल स्पष्टीकरण दिलेले नाही. त्याचप्रमाणे साक्षीदार क्र.१ ने त्याचे फिर्यादी जबाबात साक्षीदार क्र. ३ चा कोठेही उल्लेख केलेला नाही.

परिणामी, साक्षीदार क्र.१ चा पुरावा हा त्याचे फिर्यादी जबाबास सुसंगत असल्याचे दिसुन येत नाही.

२७) साक्षीदार क्र.१, ४ व वैद्यकीय अधिकारी साक्षीदार क्र.५ यांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, फिर्यादी साक्षीदार क्र.१ व त्याची पत्नी साक्षीदार क्र.४ यांनी त्यांचे पुराव्यात घटनेनंतर फिर्यादी हा बेशुध्द झाला व तो दवाखान्यात बीड येथे शुध्दीवर आल्याचे कथन केले आहे. साक्षीदार क्र.१ व ४ यांनी त्यांचे पुराव्यात कोठेही फिर्यादीस घटनेनंतर उपचाराकरिता रायमोहा येथील सरकारी दवाखान्यात भरती केल्याचे कथन केलेले नाही. साक्षीदार क्र.५ चा पुरावा पाहिला असता साक्षीदार क्र.५ ने त्याचे पुराव्यात दिनांक ०१/०१/२०१६ रोजी तो ग्रामीण रुग्णालय रायमोहा येथे कार्यरत असताना फिर्यादी साक्षीदार क्र.१ हा उपचाराकरिता तेथे आल्याचे व त्याचेवर उपचार झाल्याचे कथन केले आहे. त्याचप्रमाणे उलटतपासा दरम्यान साक्षीदार क्र.५ ने फिर्यादी हा उपचारा दरम्यान शुध्दीत असल्याचे कथन केले आहे. साक्षीदार क्र.१, ४ आणि वैद्यकीय अधिकारी साक्षीदार क्र.५ यांचे पुराव्यातील वरील कथनांवरुन घटनेनंतर फिर्यादी साक्षीदार हा ग्रामीण रुग्णालय रायमोहा येथे उपचाराकरिता गेला होता व त्यास उपचार करुन निशाणी ५० अन्वये वैद्यकीय प्रमाणपत्र देण्यात आले या अभियोगपक्षाच्या पुराव्याबाबत संशय निर्माण होतो.

२८) प्रस्तुत प्रकरणातील साक्षीदार क्र.३ ने त्याचे पुराव्यात घटनेनंतर त्याने बाबासाहेब बेदरे व अमोल बेदरे यांना बोलावुन फिर्यादीस त्याचे मदमापुरी येथे घेवुन जाण्यास सांगितले असल्याचे कथन केले आहे. यावरुन घटनास्थळी घटनेनंतर साक्षीदार उपलब्ध असल्याचे दिसुन येते. परंतु, सदर साक्षीदारांची साक्ष अभियोगपक्षाने नोंदविलेली नाही आणि त्याचा उल्लेख देखील केलेला नाही.

२९) फौजदारी न्यायशास्त्रानुसार अभियोगपक्षाने आरोपी विरुध्द ठेवलेले दोषारोप संशया पलिकडे जावुन सक्तीने शाबीत करणे गरजेचे आहे. सदर तत्वाच्या अनुषंगाने अभियोगपक्षा मार्फत आरोपी विरुध्द दोषारोप शाबीत करण्याकरीता तपासण्यात आलेले साक्षीदारांचा एकंदरीत पुरावा व त्याबाबत करण्यात आलेल्या वरील विवेचनावरुन असे दिसुन येते की, फिर्यादी साक्षीदार क्र.१, साक्षीदार क्र.३ व ४ यांनी त्यांचे पुराव्यात आरोपीने फिर्यादीस लोखंडी पाईपने मारहाण करुन जखमी केल्याचे कथन केले आहे. परंतु, साक्षीदार क्र.४ चे पुराव्यावरुन तिने घटना प्रत्यक्ष पाहिली नसुन तिचा पुरावा ऐकीव स्वरुपाचा असल्याने साक्षीदार क्र.४ चे पुराव्यास फारसे महत्व प्राप्त होत नाही. त्याचप्रमाणे साक्षीदार क्र.३ व ४ यांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता त्यांच्या पुराव्यात पुर्णत: विरोधाभास असुन एकसाम्यता दिसुन येते. फिर्यादी साक्षीदार क्र.१ ने त्याचे पुराव्यात खबरी जबाबा विरोधात जावुन कथने केली आहेत. साक्षीदार क्र.१ व ५ यांच्या पुराव्यात घटनेनंतर फिर्यादीने सरकारी दवाखाना, रायमोहा येथे जावुन उपचार घेतले याबाबत संशय निर्माण होतो. प्रस्तुत प्रकरणात महत्वाची बाब म्हणजेच आरोपीने लोखंडी पाईपने मारहाण केल्याचे कथन करण्यात आलेले आहे. परंतु, प्रस्तुत घटनेत वापरलेला लोखंडी पाईप जप्त करण्यात आलेला नाही. परिणामी, जरी फिर्यादी व साक्षीदार क्र.३ व ४ यांनी त्यांचे पुराव्यात दिनांक ०१/०८/२०१६ रोजी आरोपीने फिर्यादीस लोखंडी पाईपने मारहाण करुन ईच्छापुर्वक दुखापत पोहचवुन शिवीगाळ केली व जीवे मारण्याची धमकी दिल्याचे कथन केले असले तरी, वरील विवेचनावरुन अभियोगपक्षाच्या एकंदरीत पुराव्याबाबत संशय निर्माण होतो व सदर संशयाचा फायदा आरोपी मिळण्यास पात्र आहे. परिणामी, अभियोगपक्ष हे आरोपी विरुध्द ठेवण्यात आलेल्या भारतीय दंड संहिता कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ अन्वयेचे दोषारोप

शाबीत करण्यास पुर्णत: अपयशी ठरल्याचे दिसुन येते. करिता, मी मुद्दा क्र.१ ते ४ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. ५ बाबतः–</u>**

३०) मुद्दा क्र. १ ते ४ च्या निष्कर्षावरुन अभियोगपक्ष हे आरोपी विरुध्दचे दोषारोप शाबीत करु शकलेले नाहीत. त्याअनुषंगे मी मुद्दा क्र.१ ते ४ चे उत्तर नकारार्थी नोंदविले आहे. त्यामुळे आरोपी हा त्याचे विरुध्द ठेवलेल्या दोषारोपातुन निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. तसेच आरोपीने फौजदारी प्रकिया संहिता कलम ४३७ अ अन्वये जामीनाची पुर्तता केली असल्याने त्यासंदर्भात पुन्हा आदेश करणे गरजेचे नाही. सबब, मुद्दा क्र. ५ चे उत्तरा दाखल खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. आरोपीची फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड संहिता कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ अन्वये पात्र असलेल्या गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचे स्वबंधपत्र रद्द करण्यात येते.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयांत जाहीर करण्यात आला.)

AKSHAY SAMBHAJI JAGTAP
Digitally signed by AKSHAY SAMBHAJI JAGTAP
Date: 2026.03.12 17:59:23 +0530

शिरूरकासार
दिनांक १२/०३/२०२६

**(अक्षय सं. जगताप)**
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, शिरूरकासार.

"I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Judgment/order".

| | | |
|---|---|---|
| Dictated on | : | 12/03/2026 |
| Transcribed on | : | --------------- |
| Checked & signed on | : | 12/03/2026 |

SAGAR SOPANRAO AJABE

Digitally signed by SAGAR SOPANRAO AJABE
Date: 2026.03.12 17:59:49 +0530

**[Sagar S. Ajabe]**
Stenographer Grade-3